# प्रकरण पहिले

# प्रास्ताविक व पूर्वाभ्यासाचे स्वरूप

# प्रकरण -१

## प्रास्ताविक आणि पूर्वाभ्यासाचे स्वरूप

आप्पासाहेब खोत यांच्या पूर्वकालीन आणि समकालीन कथालेखनाचे स्वरूप

मराठी साहित्यात मानवी जीवनाचे चित्रण आत्मशोध आणि जीवन शोध या अंगाने आलेले आहे. त्यात विविधता आहे. विपुलताही आहे. कथा, कादंबरी, कविता, नाटक या माध्यमातून ते व्यक्त होत आहे. आधुनिक मराठी कथेचा विचार करता ती इंग्रजी वाङ्मयाच्या परिशीलनातून आली. तिची व्याख्या करण्याचा प्रयत्न अनेक पाश्चात्य विद्वानांनी केला. मराठीत ही तिची तात्विक स्वरुपात चर्चा झाली. ना. सी. फडके यांनी कथा म्हणजे "शक्य तितक्या परिणामकारक रितीने आणि शक्य तेवढ्या कमी पात्र प्रसंगांच्या सहाय्याने सांगितलेली गोष्ट म्हणजे लघुकथा "[१] अशी व्याख्या केली आहे. वाचकांच्या मनावर एकच एक संस्कार ही कथा करीत असते.

## पूर्वाभ्यासाचे स्वरुप –

मराठीत ग्रामीण साहित्य विशिष्ट अशा जीवनाचा अनुभव देणारे एक वैशिष्ट्यपूर्ण साहित्य मानले जाते. तेथील भाषा ही त्याचे खास वैशिष्ट्य ठरते. या ग्रामीण साहित्यातून खेड्यातील शेती, तेथील जीवनपध्दती, निसर्ग, तेथे वावरणाऱ्या माणसाचे मन, त्यांचे आर्थिक, सामाजिक प्रश्न इ. गोष्टींना प्राधान्य दिले जाते. या साऱ्या गोष्टीशी, ग्रामीण कथा एकनिष्ठ असते. तिचा अनुभव वैशिष्ट्यपूर्ण असून ती वास्तवतेला प्राधान्य देते.

ग्रामीण कथा म्हणजे काय ? या प्रश्नाचे उत्तर नागर कथेपेक्षा पूर्णपणे वेगळी मानली जाते. ग्रामीण कथेतून खेड्यातील जीवन पध्दतीचा आविष्कार होतो. तेथील

शेती, निसर्ग , माती, गावगाडा या साऱ्यांशी ती निगडीत असते. खेड्यातील संस्कृतीची प्रादेशिक वैशिष्ट्ये तिच्यात प्रतिबिंबीत झालेली असतात. ग्राम जीवनात उद्भवणारे असंख्य प्रश्न त्याच्या अडीअडचणी त्यांना पडलेल्या मर्यादा या ग्रामीण कथेतून चित्रित होतात. म्हणजेच ग्रामीण कथेत खास ग्रामीण अनुभूतीला प्राधान्य दिलेले आढळते. त्यामुळे ती अस्सल ग्रामीण ठरते.

भारत हा कृषिप्रधान देश आहे आणि कृषिनिष्ठ समाज म्हणजे ग्रामीण समाज होय. हा देश म्हणजे खेड्यांचा देश आहे, शिवाय महाराष्ट्राची संपूर्ण जीवनपध्दती खेड्यातील आहे. या खेड्यातील माणूस परिस्थितीशी झुंज देत जीवन जगत असतो. निसर्गाशी, त्या मातीशी त्याचे जवळचे नाते असते. या संबंधीचे जे चित्रण ज्या कथेतून येते तिला ग्रामीण कथा असे म्हटले जाते.

ग्रामीणता म्हणजे काय ? तर ग्रामीण समाजात विशिष्ट परंपरागत उद्योग असतात. कुणब्याला केंद्रस्थानी मानून बारा बलुतेदारांचे रिंगण त्याच्याभोवती असते. तो त्या खेड्यातल्या समाज पध्दतीचा आत्मा असतो. त्याचे चित्रण ग्रामीण साहित्याला जवळचे ठरते.

खेडी म्हटले की, तिथे परिस्थितीने गांजलेली माणसे, लोकाचार, रुढी यांचे स्थान. चाकोरीबध्द जीवनाचे तंत्र, रुढी परंपरेत अडकलेली व त्याचा भंग झाला तर गावगाडा देईल ती शिक्षा भोगणे असे त्याचे जीवन पिढ्यान् पिढ्या चालत आलेले असते. अंधश्रध्देच्या आहारी गेलेली जनता जारण-मारण, चेटुक मेटुक, देवदेवर्षी या साऱ्या गोष्टी ग्रामीण समाजात पाहता येतात. महाराष्ट्रातील ऐंशी टक्के जनता खेड्यात राहिल्याने शेतीप्रधान कृषी संकृती पुढे आली आहे. ग्रामीण परिसरातील शेती, पिके लावणी, खुरपणी, काढणी, मळणी याबरोबरच रीतीरिवाज, देवदेवता, धार्मिक आचार-विचार यांनाही ग्रामीण जीवनात महत्वाचे स्थान प्राप्त झाले आहे.

डॉ. नागनाथ कोतपल्ले यांचे मते "ग्रामीण जीवनातून फुलणारे त्या वास्तवातून साकार होणारे साहित्य ग्रामीण असते." ग्रामीण भागात सर्वदूर पसरलेल्या समाजाची स्वतंत्र ग्रामसंस्कृती असते. ती शहरापेक्षा भिन्न असते. त्यामुळे त्याच्या मानवी स्वभावातही बदल दिसून येतो. तेथे कृषीसंस्कृती ग्रामीण वास्तवतेचा पाया असते." ग्रामीण व प्रादेशिक या संज्ञात साम्य असले तरी या दोन्ही संज्ञा त्यांनी एकच

मानल्या आहे. अर्थात या दोन्ही संज्ञामध्ये समांतरताच आढळते."२

महाराष्ट्रीय समाज अनेक स्तरीय आहे. या समाजात वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था फार पूर्वीपासून अस्तित्वात आहे. त्यामुळे उद्योग व्यवसाय, शिक्षण, संस्कार, सामाजिक दर्जा, ज्ञानाची पातळी आणि रीतीरिवाज वेगवेगळे असलेले आढळतात. स्वातंत्र्योत्तर काळात या बहुजन समाजाच्या विविध स्तराचे स्वरूप बदलले आणि सामाजिक, शैक्षणिक पातळीवर तिचे विकसन सुरू झाले. म्हणजेच ग्रामीण साहित्याच्या संदर्भात सामाजिक, वाङ्‌मयीन परिस्थिती बदलली.

ग्रामीण भागात सांस्कृतिक परंपरा पिढ्यान्‌पिढ्या चालत आलेली असते. या सांस्कृतिक जीवनाचे प्रतिनिधीत्व करणारे डोंबारी, कैकाडी, कडकलक्ष्मी, वाघ्या-मुरळी, जोगती, कुडनुडे जोशी हे लोककलाकार आढळतात. ग्रामीण साहित्यातून त्यांचे चित्रण झालेले आढळते. खेड्यातल्या अनेक जाती आपली परंपरा जपतात. अनेक संचित रुढी परंपरा पुढे घेऊन त्या चालत असतात. या साऱ्यातून ग्रामीण साहित्याचे स्वरूप स्पष्ट होते. ग्रामीणता ही भूमिका अधिक समजून घ्यावयाची झाल्यास गावगाडा, ग्रामसंस्कृती त्यात असणारे उपेक्षित, शोषित व स्थलकाल चित्रण लक्षात घ्यावे लागते.

**निसर्ग :-**

भारत या शेतीप्रधान देशात जास्तीत जास्त मानवी जीवन खेड्यात दिसत असल्याने शेती व निसर्ग यांचा जवळचा संबंध आढळून येतो. शेतीवर निष्ठा असणाऱ्या शेतकऱ्याला त्या निसर्गाशी झुंज देत जगावे लागते. प्रसंगी त्याची शेती निसर्गावर अवलंबून असते. निसर्गात बदलणाऱ्या वातावरणाचा परिणाम वारंवार त्या शेतीवर होत असतो. त्यामुळे शेतकऱ्याला प्रसंगी झळही सोसावी लागते. त्याला बऱ्याचवेळा निसर्ग साथही करतो. परिणामी निसर्ग हा ग्रामीण जीवनातला एक अपरिहार्य घटक आहे. त्याला सोडून ग्रामीण जीवनाचा विचार केला जात नाही. म्हणून वारंवार या निसर्गाचे प्रतिबिंब ग्रामीण कथेत पडलेले पहावयास मिळते.

**कृषी संस्कृती :-**

ग्रामीण समाजात विशिष्ट परंपरागत उद्योग असतात. कुणबी त्यांच्या केंद्रस्थानी असतो. त्याच्यासोबती बारा बलुतेदारांचे वर्तुळ फिरत असते. खेड्यातल्या समाज पध्दतीचा कुणबी हा आत्मा असतो. त्या कुणब्याचा शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने लोहार, सुतार, कुंभार, कोळी, न्हावी, महार, परीट हे त्यांना प्रांजळपणे मदत करतात. त्यांच्या उपजिविकेचे साधन त्या कुणब्याचे शेत ठरते. त्यामुळे कुठल्याही प्रकारची आडकाठी न आणता तेही त्याच्याशी एकरूप होतात. असे चाकोरीबध्द जीवन त्यांच्या पिढया जगत असतात. ग्रामीण संस्कृतीत या परंपरागत चाकोरीबध्द जीवनाला महत्वाचे स्थान प्राप्त झालेले असते. अशी ही कृषी संस्कृती या खेड्यातल्या जीवनपध्दतीचा पाया ठरते. कुणबी जमिनीत राबून कष्ट करून पिके पिकवितो तेव्हा शेजाऱ्याशी होणारे हेवेदावे भांडणे मारामाऱ्या कोर्टकचेऱ्या या साऱ्यांना एक वेगळेच महत्व प्राप्त होते. त्यामुळे हे सारे चित्रण ग्रामीण कथेत योग्य प्रकारच्या जाणीवेने रंगविले जाते. एकूणच ग्रामीण समाजातील मध्यवर्गीय माणसाचे समग्र जीवन या कथा विषयाला केंद्रभूत ठरते.

**रुढी परंपरा व अंधश्रध्दा :**

खेडी म्हटले की, आपल्या मनासमोर उभी राहतात ती परिस्थितीने गांजलेली माणसे ! लोकाचार , रुढी यांचे त्यात चाकोरीबध्द जीवनाचे तंत्र, रूढी परंपरेत अडकलेली व त्याचा भंग झाला तर गावगाडा देईल ती शिक्षा भोगणे असे त्यांचे जीवन असते. या खेड्यात पिढ्यान्‌पिढ्या अंधश्रध्देच्या आहारी गेलेली जनता. जारण-मारण, चेटूक-माटुक, देव-देवर्षी यावर त्यांचा विश्वास असतो. ग्रामीण समाजात या सर्व गोष्टी जवळून पाहता येतात व ग्रामीण कथेत याचे चित्रण आलेले असते.

अज्ञान आणि शिक्षणाचा अभाव यामुळे अंधश्रध्देच्या आहारी जाऊन त्यातून संकटमुक्त होण्यासाठी विविध प्राण्याचा बळी दिला जात असे. याचे समग्र दर्शन खेड्यात दिसते. अशी ही अंधश्रध्दा खेड्यातं -समाजात पिढ्यान्‌पिढ्या रूजली गेल्याचे त्याचे चित्रण ग्रामीण कथेला जवळचे वाटते.

**मुक्या प्राण्यावर प्रेम :-**

ग्रामीण परिसर म्हटला की, तेथील शेती आणि शेतीशी संबंध असणारे प्राणी त्या मुक्या प्राण्यावर ग्रामीण माणूस जीवापाड प्रेम करीत असतो. तो त्याच्या कुटुंबातील एक अविभाज्य घटक होवून राहिलेला असतो. शिवाय प्राणी ही त्याच्याशी एकनिष्ठ राहणारं असतो. पिढ्यान्‌पिढ्या आपले व मालकाचे असलेले पारंपारिक नाते तो सांगून जातो. खेड्यातल्या मुक्त संवेदनेच्या अंगाने अनुभवास येणारे हें प्राणी जीवन असते. तेथील समाजाशी किंवा व्यक्तिजीवनाशी त्याचा घनिष्ट संबंध असतो. त्या परिसराशी ते निगडीत असते. तेव्हा ग्रामीण कथेतून त्याचे स्पष्ट व मुक्त दर्शन घडते.

**ग्रामीण मन :-**

ग्रामीण संस्कृतीत मनाच्या प्रवृत्तीला महत्वाचे स्थान असते. माणूस पिढ्यानपिढ्या राबत आलेल्या मातीवर तो प्रेम करतो. पावसासाठी तो तळमळतो. स्वत:च्या व कुटुंबाच्या पोटाची तो काळजी करतो. दुसऱ्याच्या दबावाखाली राबून पोटापुरती मजुरी मिळत नाही. त्यामुळे तो तडफडत असतो. आपले कसे होणार या भावनेने त्याचे मन त्याला खात असते. एकूणच परिस्थितीच्या गर्तेत तो सापडतो. दैव फिरल्याने मनाची होणारी कुचंबणा व मनावरचा ताबा सुटल्याने मनाची मोठी घसरण होत राहते. या साऱ्या गोष्टी ग्रामीण समाजात पाहण्यास मिळतात. वाऱ्याप्रमाणे धावणारे, दबणारे विचार न करता काहीही करण्यास भाग पाडणारे अवखळ व खट्याळ मन ग्रामीण माणसाच्या प्रवृत्ती स्पष्ट करते. ते ज्या मातीत मन रमते त्या मातीला, शेतीला सोडून जाणार या काळजीने ते शेवटपर्यंत दु:ख करत राहते. एकूणच ग्रामीण कथेत मनाच्या विविध तऱ्हाचे, प्रकारचे चित्रण प्रभावीपणे झालेले आढळते. ममाच्या प्रवृत्तीचा शोध घेणे हे ग्रामीण कथेत महत्वपूर्ण ठरते. कलात्मक जाणीव व्यक्त होऊन ती कथा पुढे पुढे सरकत असते.

**दारिद्रय व अस्पृश्यता :-**

ग्रामीण समाज विविध स्तरात विभागलेला आहे. शिवाय दारिद्रयात अज्ञानात जीवन कंठणारा आहे. अन्याय, अत्याचार, फसवा-फसवी संधीसाधूच्या जाळ्यात तो केव्हा आणि कसा सापडेल याचा नेम नाही. सर्व बाजूंनी शेतकरी - कष्टकरी शेतमजूर या शोषकांच्या विळख्यात रुतलेला होता. दुःखाशी दारिद्रयाशी सामना करतच त्याचे आयुष्य संपून जाई. या विदारक स्थितीचे चित्रण ग्रामीण कथेने अचूकपणे टिपलेले आहे. गावगाड्यात परंपरेने ज्यांना गावकुसाबाहेर ठेवलेले आहे. रोजचीच उपासमार, दारिद्र्य यात दोन हात करत जीवनमान कंठीत राहणे ज्याच्या नशिबी आहे अशा अस्पृश्य समाज हा ग्रामीण साहित्याचा मानबिंदू होय. शंकरराव खरात, श्री. म. माटे, आण्णाभाऊ साठे, भास्कर चंदनशिव यांच्या कथेतून याचे वास्तवपूर्ण रीतीने चित्रण चित्रीत झाले आहे. जीवन जगताना होणाऱ्या जीवघेण्या यातना, अवहेलना, पिळवणूक, किळसवाणे अनुभव हे सारे अस्पृश्यांच्या जीवनातील वास्तव दर्शन ग्रामीण कथा घडवीत राहते. काही अश्लिल उल्लेख ही विपुल प्रमाणात या कथेतून साकारले जाऊ लागले तेव्हा या अस्पृश्य समाजातील व्यक्तिला जास्तीत जास्त दारिद्रयाची पीडा सहन करावी लागली. त्यामुळे खून, दरोडे, मारामाऱ्या या गोष्टीला त्याला सामोरे जावे लागले. त्यामुळे त्यांच्या जीवनातील सूक्ष्म भागाचा वेध घेणारी दृष्टी काही ग्रामीण कथाकारांत निर्माण झाली आणि अस्पृश्य समाजाचे प्रभावी चित्रण कथेतून साकारले गेले. अस्पृश्यतेच्या दुसऱ्या अंगाचा विचार उपेक्षित माणसाच्या विश्वाचा विचार करून करता येतो. या चित्रणात त्या ग्रामव्यवस्थेतील महार, मांग, चांभार, सुतार, सोनार या बलुतेदारांच्या जवळ जाणारे प्रभावी दर्शन ग्रामीण कथेत घडते.

## आप्पासाहेब खोत यांच्या पूर्वकालीन कथालेखनाचे स्वरूप -

ग्रामीण कथालेखन करण्याच्या उद्देशाने जी कथा लिहिली गेली ती पहिली ग्रामीण कथा म्हणून हरिभाऊ आपटे यांची. 'काळ तर मोठा कठीण आला' ह्या कथेचा निर्देश करावा लागतो. कारण तिच्या अगोदर ग्रामीण जीवनाचे चित्रण कोणत्याही कथेतून झालेले नाही, हे प्रकर्षाने लक्षात घेतले पाहिजे.

१८९७ ला महाराष्ट्रात दुष्काळ पडला. डेक्कन सभेच्या इतिवृत्तात त्यांनी

दुष्काळाची घटना वाचली आणि त्यावर त्यांची कथा आकाराला आली. दुष्काळामध्ये शेतकऱ्यांच्या जीवनाची कशी वाताहत झाली याचे हृदयद्रावक चित्रण त्यांनी या कथेत केले आहे. अन्नास महाग झालेला शेतकरी पण त्याचे त्याच्या गुराढोरांवर असलेले प्रेम उत्कटतेने व्यक्त झालेले आहे. बैल विकून चार दिवस तरी कुटुंबाला सुखात घालविता येतील म्हणून बैल विकण्यासाठी निघालेल्या आपल्या नवऱ्याला पत्नी म्हणते की, निदान कसायाच्या दावणीला तरी बांधू नका. परंतु त्या शेतकऱ्याला फसवून तो बैल कसायाने विकत घेतलेले असतात. हे समजताच दु:खी झालेला शेतकरी, कुटुंब जगविण्यासाठी शहरात मजुरीसाठी आलेला शेतकरी आणि त्याच्या कुटुंबाची झालेली वाताहत लक्ष वेधून घेणारी आहे.'[३] दुष्काळ हा ग्रामीण जीवनात उलथापालथ करणारा महत्वाचा घटक आहे. हरिभाऊंच्या ह्या कथेने ग्रामीण कथा वाङमयाचा प्रारंभ केला असे म्हणावे लागते.

१९२० नंतरच्या काळात महाराष्ट्रात गांधीवादाचा प्रभाव प्रचंड स्वरूपात पडला. त्यात साम्यवाद, समाजवादाचीही भर पडली. संपूर्ण जीवनपध्दती बदलू लागल्याची चिन्हे दिसू लागली. भारत हा खेड्याचा देश आहे हे जाणूनच गांधीजीनी 'खेड्याकडे चल' ही हाक दिली. खेड्यातील माणूस बदलला पाहिजे. हा त्याच्या मागचा उद्देश होता. म्हणून त्यांनी हा मूलमंत्र लोकांना दिला. याचा परिगाम संपूर्ण दूरवर पसरलेला प्रदेश आकृष्ट झाला व त्याचा विचार होऊ लागला. एकूणच साहित्यात ग्रामीण वाङ:मय प्रादेशिक साहित्य असे शब्द येऊ लागले. आणि ग्रानीण कथेला स्वत:चे अधिष्ठान प्राप्त झालेले दिसते. वि. स. सुखठणकर 'सह्याद्रिच्या पायथ्याशी,' लक्ष्मणराव सरदेसाई 'कल्पवृक्षाच्या छायेत' 'सागराच्या लाटा' 'वादळातील नौका' 'ढासळलेले बुरूज' या दोन्ही लेखकानी आपल्या कथांच्यातून गोमंतकातील निसर्ग आणि मानवी स्वभावाचे दर्शन घडविले आहे. याच दरम्यान ग. ल. ठोकळ, द. रा. कवठेकर, म. भा. भोसले यांनीही कथालेखन केले परंतु त्यांच्या लेखनामध्ये रोमँटिक वृत्तीचा प्रत्यय येतो. ठोकळांनी कथेला स्वतंत्र तंत्रात बसविण्याचा प्रयत्न केला. त्यांनी वास्तवापेक्षा कल्पनाजन्य घटनांवर भर दिला. रानदांडगेपणा आणि जुलुम जबरदस्ती करणाऱ्या व्यक्ती साकार केल्या. ग. ल. ठोकळ यांचे कथाविश्व व्यापक असले तरी त्यांनाही अद्भूततेचे आकर्षण असल्यामुळे त्यांना ग्रामीण जीवनाचा तळ पकडता आला नाही. 'पहिले बक्षीस,' 'वाकडेवाडीचा गावगुंड' सारख्या

कथेतून ग्रामीण परिसरातील दारिद्रय, दुःख व्यक्त झालेले असले तरी अतिशयोक्ती वर्णन वास्तवापासून दूर गेलेले दिसते. कवठेकर यांनी रूचिपालट म्हणून ग्रामीण कथा लिहिली. म. भा. भोसले, ग्रामीण प्रेरणेतून कथालेखन करतात परंतु त्याच्या कथेतही जीवंतपणाचा अभाव दिसतो. वामन चोरघडे, बी. रघुनाथ चि. य. मराठे यांनीही अल्प स्वरूपात ग्रामीण कथालेखन केले आहे.

श्री. म. माटे यांच्या कथानी ग्रामीण कथा वाङ:मयाला सामाजिक वास्तवाचे भान दिले. 'उपेक्षिताचे अंतरंग', 'माणुसकीचा गहिवर', 'भावकथा' या संग्रहातील कथा जबरदस्त वास्तवतेचा प्रत्यय आणून देतात. माटे यांचे कार्य समाजसुधारकाचे होते. अस्पृश्य समाजाच्या उन्नतीसाठी कार्यरत असल्यामुळे त्यांच्या कथेतून आलेल्या व्यक्ती या त्यांच्या अवतीभोवती वावरलेल्या व्यक्ती होत्या. त्या व्यक्तिंच्या जीवनातील दुःख, दैन्य, दारिद्रय, माटे यांनी प्रत्यक्ष आपल्या डोळ्यांनी पाहिले होते, अनुभवले होते. त्यामुळेच तारळ खोऱ्यातील पिऱ्या या कथेतील पिऱ्या मांग-दरोडेखोर का व कसा झाला यामागील मानसिकता माटे शोधताना दिसतात. 'अस्पृश्यांच्या डायरीतील पाने' या कथेत अस्पृश्य माणसाला करावी लागणारी गावकीची कामे आणि त्यातून त्याची होणारी उपेक्षा आणि उपेक्षेतूनच 'कृष्णाकाठचा रामवंशी' न्यायाधीशासमोर उभे केले असता 'आमाला बरं दिस येत्याल' असे न भिता सांगतो. खालच्या स्तरातला दलित माणूस आपले दुःख वेदना सहन करून उपेक्षित जीवन जगतो आहे हे त्यांनी गांभीर्याने मांडले म्हणजेच त्यांनीं खरा ग्रामीण माणूस कथेतून साकार केला. खऱ्या अर्थाने. ग्रामीण जीवनाच्या अंतरंगाचा विचार केल्याने आशय आणि अभिव्यक्तीदृष्ट्या त्यांची कथा वैशिष्ट्यपूर्ण तर ठरतेच शिवाय प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधात किंवा वर्णव्यवस्थेच्या विरोधात परखडपणे विचार मांडते अशी परखड आणि विद्रोही भूमिका माटे घेत नाहीत तर सामाजिक प्रश्नांच्या संदर्भात ते हळहळ व्यक्त करतात. त्यामुळे त्यांच्या कथेने मानवतावादी दृष्टी स्वीकारलेली आहे हे जाणवत राहते.

१९४५ नंतर मराठी साहित्य विश्वात नवतेचे वारे वाहू लागले होते. दुसरे जागतिक महायुध्द, यंत्रयुग विज्ञान आणि मानसशास्त्राच्या क्षेत्रात झालेले नवे संशोधन यांनी मानवी जीवनात काही मुलभूत प्रश्न निर्माण केले. युध्दामुळे आर्थिक मंदी, यंत्रामुळे मानवी जीवनात यंत्रवत स्थिती मानसशास्त्रीय संशोधनाने श्रध्दा व

नीतीमूल्याविषयी निर्माण झालेली साशंक दृष्टी, या सर्वांचा परिणाम मराठी कथा वाङ:मयावरही झाला. यातून गंगाधर गाडगीळ, अरविंद गोखले, पु. भा. भावे आणि व्यंकटेश माडगूळकर या समर्थ कथाकाराच्या लेखणीतून नवकथा उदयाला आली.

व्यंकटेश माडगूळकर यांचे वैशिष्ट्य असे की, त्यांनी ग्रामीण कथेला मराठी कथा वाङ:मयाच्या इतिहासात महत्वाचे स्थान प्राप्त करून दिले. त्यांच्या कथेचा पट आशयदृष्ट्या खूप व्यापक आहे. त्यांच्या कथा एकत्रितपणे वाचल्या की सगळा गावगाडाचा आपल्या डोळ्यासमोर उभा राहतो. पाटील, कुणबी, शाळा मास्तर, तेली, कोष्टी, वाणी, महार, मांग, वैदू, रामोशी, कातकरी, पारधी, नंदीवाले, माकडवाले, गोसावी या साऱ्यांचे गावगाड्यातील परस्पर संबंध माडगुळकरांच्या कथातून स्पष्ट होत जातात. माडगूळकरांनी ग्रामीण माणसाच्या जीवनाला अधिक स्पर्श केला आहे. त्यांचे दु:ख, दारिद्रय शोषण याचे चित्र त्यांनी रंगविलें आहे. ग्रामीण माणसाच्या विविध प्रवृत्ती सुष्ट-दुष्ट, भोळेपणा, धूर्तपणा, इमानी, बदमाश, लोभी, उन्मत्तपणा इ. यांचे दर्शन त्यांनी व्यक्तिरेखाटनातून दाखवून दिले. 'माणदेशी माणसं' या कथासंग्रहात या सर्व कथा आहेत. माडगूळकरांच्या व्यक्ती चित्रणात्मक कथेबरोबरच त्यांनी प्राणी जगताची भावाभिव्यक्ती प्रभावीपणे चित्रित केली आहे. 'गावाकडच्या गोष्टी' किंवा 'काळ्या तोंडाची' कथेतील चंपी कुत्री, शिवाय 'सत्तांतर' कादंबरीतील वानर आणि इतर प्राणी कुटुंबाची रेखाटलेली चित्रे मनोवेधक आहेत. त्यांच्या कथेतील व्यक्ती प्रसंग, घटनाचित्रण, प्रदेश, निसर्ग, प्राणी व पक्षी यांचे यथार्थ चित्रण साकार झाले आहे. एखाद्या घटना प्रसंगाचे आणि निर्जीव वास्तूचे मग ते हॉटेल असो की दुकान असो अथवा वाडा असो त्याला शब्दशैलीने जीवन रूप देतात. दु:ख, दैन्य यांचे वास्तव हृदयस्पर्शी चित्रण चित्रित करून माडगूळकरांनी संपूर्ण माणदेश प्रदेश आपल्या साहित्यात उभा केला आहे. यानंतर मराठी साहित्यात त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून अनेकांनी ग्रामीण जीवनाचे वास्तव विदारक दर्शन घडविले आहे.

यानंतर शंकर पाटील यांनी विनोदी अंगाने ग्रामीण कथेच्या क्षेत्रात महत्वपूर्ण कार्य केले. त्यांची विनोदी कथा ही केवळ हास्याचे फवारे उडविणारी नसून वास्तवाच्या विसंगतीतून ती आकाराला आली आहे. ग्रामीण जीवनातील व मनातील अनेक ताणतणाव चित्रित करण्यात पाटील यशस्वी झाले आहेत. ग्रामीण

कुटुंब आणि त्यांचे परस्पर संबंध यातील कुटुंबात पार पाडाव्या लागणाऱ्या जबाबदाऱ्या आणि परिस्थितीत हतबल झालेला पुरूष याचे दु:ख, दारिद्रय यांचे अनेक पदर उलगडत त्यांची कथा पुढे सरकत राहते. 'लोडणा', 'भुंजंग 'सारवण' 'वेणा' या कथा यादृष्टीने पाहण्यासारख्या आहेत. तर 'धिंड' आणि 'ताजमहालात सरपंच मिटींग' या कथातून उपहास आणि दु:ख यांचा प्रत्यय येतो. त्यांची कथा आकांक्षा उत्कटइच्छा, अंधश्रध्दा आणि भोळसटपणा या प्रवृत्तीतून जन्माला येते. त्यातून एक ग्रामीण मानस व्यक्त होत राहतो. तर काही वेळा जीवन आणि निसर्ग यांचे अतूट नाते त्यांच्या कथेतून दिसते, तर काहीवेळा तो जीवनाचा अपरिहार्य भाग म्हणून त्यांच्या कथेतील निसर्ग दृष्टीस पडतो. शंकर पाटील यांनी ग्रामीण कथेला मनोविश्लेषणाची डूब देऊन तिच्यात भावपूर्णता आणि नाट्यमयता आणली, शिवाय अभिव्यक्तीचे नवे घाट दिले. एकूणच त्यांनी ग्रामीण कथेला वाङ्मयीनदृष्ट्या अधिक संपन्न केले.

द. मा. मिरासदार हे ही शंकर पाटील यांच्या समकालीन कथालेखक होय. परंतु शंकर पाटील यांच्यापेक्षा मिरासदार यांची लेखनप्रवृत्ती वेगळी आहे. विनोदी अंगाने ते जीवनदर्शन घडवतात. परंतु त्यांच्या विनोदी कथा किस्सेवजा झाल्या आणि जीवनदर्शनाचे सामर्थ्य व्यक्त करण्यात त्यांची कथा कमी पडते. कारण ग्रामीण जीवन मिरासदारांनी प्रत्यक्ष अनुभवलेले नसून वकिलीच्या व्यवसायामुळे वडिलांकडे येणारी ग्रामीण परिसरातील माणसे त्यांचे मर्यादित जीवनविश्व त्यांच्या कथेतून येते. त्या माणसांचे व्यक्तीस्वभाव आणि प्रसंगानुसार नमुनेदारपणा यांचे घरबसल्या निरीक्षण करून त्यांनी कथा लेखन केले आहे. त्यातून त्यांनी बढाईखोर, धूर्त, कावेबाज, त्रिकूट अशा स्वभावाच्या व्यक्ति आपल्या कथातून उभ्या केल्या. कथेचा घाट, घटना व प्रसंग उभारणी करताना चोऱ्या, मारामाऱ्या, गुन्हे, खटले, साक्षी, प्रेत, भूत, फसवणूक यांचा सर्रास वापर केला. ग्रामीण विनोदी कथा म्हणून मिरासदाराची कथा श्रेष्ठ आहे. त्यात शाब्दिक कोटीक्रम नाही तर निवेदनाच्या मिस्किलीपणातून ते विनोद साकार करतात. शिवाय व्यक्तिस्वभाव आणि जीवनातील विसंगतीतून त्यांचा विनोद साकार होतो.

बाबा पाटील यांनी ग्रामीण जीवनाच्या वास्तवतेचे विदारक चित्रण आपल्या कथातून व्यक्त केले आहे. त्यांची कथा शेतकऱ्यांचे दैन्य, दु:ख याचे अनेक



SHIVAJI UNIVERSITY (LIBRARY) KOLHAPUR

पदर उलगडत जाते. पिकाची होणारी नासाडी, शेतकऱ्यांच्या वाट्याला आलेले म्हातारपण, त्याचा असणारा श्रध्दाळू स्वभाव यांचे चित्रण तर येतेच पण ग्रामीण माणसाच्या असणाऱ्या श्रध्दा आणि त्याच्या मनात येणारे वाईट विचार यांच्या संघर्ष त्यांच्या कथेतून येतो. या दृष्टीने 'कळस' ही त्यांची कथा पाहण्यासारखी आहे. या कथेत वारकरी पंथाची माळ गळ्यात घालणाऱ्या माळकऱ्याला मटण खाण्याची इच्छा होते हे या कथेचे सूत्र आहे.

उध्दव शेळके यांना विदर्भातील ग्रामीण जीवनाचे चांगले आकलन झाल्याने त्यांनी आपल्या कथाविश्वातून संपूर्ण वैदर्भीय जीवन सुख-दुःखासहित आणले आहे. त्यांचा 'शिळान अधिक आठ कथा ,' 'वानगी' 'घुसळण' या कथासंग्रहातून दुःख, दारिद्र्याबरोबरच ग्रामीण चालीरीती, रूढी, परंपरा, मानवी वृत्ती- प्रवृत्ती यांचे यथार्थ जीवनाचे दर्शन ते घडवतात. ग्रामीण परिसरात होणारी भांडणे, गुन्हे, बलात्कार यामुळे उपेक्षिताना, गरिबांना वाटणारी असुरक्षितता, पोटासाठी शहराकडे येणारे स्थलांतर आणि त्यातून उद्‌भवणाऱ्या नवीनच समस्या या साऱ्यांचा पट शेळके यांनी आपल्या कथेत शब्दबध्द केला आहे. त्यासाठी खास आपल्या वैदर्भीय भाषाशैलीचा वापर केल्याने त्यांची कथा अधिकच परिणामकारक झाली आहे. याच दरम्यान रणजित देसाई हे लिहित होते. मराठी ग्रामीण कथेला एका वळणावर नेऊन पोहोचविणारे कथाकार म्हणजे आनंद यादव होय. 'खळाळ' , 'मातीखालची माती' 'उखडलेली झाडे' या कथासंग्रहातून त्यांनी कागलचा परिसर आणि तेथील माणसे, निसर्ग यांचे चित्रण केले आहे. शेतकऱ्यांच्या जीवनातील दुःख, अगतिकता लाचारी कष्टमय जीवन यांचे जबरदस्त वास्तव विदारक दर्शन ते घडवितात शिवाय ग्रामीण स्त्रीची होणारी वाताहत ते समर्थपणे टिपतात. शहरीकरणाचा व औद्योगिककरणाचा ग्रामीण जीवनावर होणारा परिणाम नेमकेपणाने ते मांडतात. 'इंजेन' ही कथा पाहण्यासारखी आहे. यादवाच्या कथेला वास्तवतेची अधिक बळकटी येते. त्याचे कारण त्यांनी प्रत्यक्ष ते जीवन अनुभवलेले होते. त्यांचा पिंड त्यावर पोसलेला होता. जवळून पाहिले होते. त्यामुळे लेखनात एक प्रकारची जाणीव-नेणीवसह ते मूळ आशयाला रूप प्राप्त करून देतात. अभिव्यक्तीसाठी ग्रामीण बोलीचा शैलीचा ते वापर करतात. संपूर्ण ग्रामीण परिसर त्यांच्या कथाविश्वात साकार होतो. निसर्ग आणि मानव यांचे अतूट नाते ते प्रस्थापित करतात. यामुळे मराठी ग्रामीण कथा

वाङ्मयात त्यांची कथा इतर कथाहून वेगळी ठरते - सरस होते.

रा. रं. बोराडे यांनीही मराठवाड्यातील ग्रामीण जीवनाचे वास्तव विदारक दर्शन आपल्या कथा विश्वातून घडविले आहे. 'पेरणी ', 'मळणी ', 'नातीगोती', 'बोळवण' , ' माळरान', 'राखण' , 'बुरूज', हे त्यांचे अतिशय गाजलेला कथासंग्रह यात त्यांनी ग्रामीण कुटुंब व्यवस्थेतील नात्या-नात्यामध्ये निर्माण होणारा ताण-तणाव अभिव्यक्त केला आहे. आई-बाप, बहिण-भाऊ, मुले-मुली, सगे-सोयरे, जावई-व्याही अशी या नात्यागोत्यातून होणारी कोंडी, शिवाय प्रत्येकाचे हितसंबंध जपताना होणारी दमछाक याचे विदारक चित्रण बोराडे यानी केल्याचे दिसते. याशिवाय माणसाचे असणारे अज्ञान, दारिद्रय, दुःख, कष्टमय जीवन, कुटुंबात स्त्रियांची होणारी कुचंबना, तिच्यावर होणारे अन्याय, अत्याचार, बलात्कार यांचे चित्रण ते करतातच तथापि ग्रामीण स्त्री-पुरुषाची कामवासना, म्हातारपणाचे दुःख, बालमजुराचे प्रश्न इ. अनेक विषय त्यांनी आपल्या कथातून हाताळले आहे. बदलत्या जाणीवासह बोराडे यांनी बदलत्या मनाचा वेध घेतला आहे. हे त्यांच्या कथेचे वेगळे वैशिष्ट्य होय.

सखा कलाल :- ग्रामीण जीवनाचे अत्यंत सौम्य, मंद तरल शैलीत चित्रण करणारे कथाकार म्हणून त्यांच्या कथेचे वेगळेपण लक्षात येते. 'ढग' या कथासंग्रहातील कथांचा आढावा घेतल्यानंतर ग्रामजीवनातील दुःखाच्याच कहाण्या ते विणतात असे जाणवते. या दृष्टीने 'ढग,' 'बळी,' 'इरादा,' 'मादी' या कथा पाहण्यासारख्या आहेत. दुःखाबरोबरच दारिद्रय, मागासलेपणा बेभान होणाऱ्या प्राथमिक भावना याचे संवेदनशील चित्रण त्यांच्या कथेत काव्यात्मकतेच्या जाणीवेसह येत आहे. असे वाटत राहते. आणि शंकर पाटलांच्या कथेप्रमाणे ग्रामीण बोलीचा, ग्रामीण परिसराचा आणि निसर्गाचा योग्य तो वापर केलेला असला तरी त्यांची कथा मानवी मनांचा विषय रेखाटते.

हमीद दलवाई, मधु मंगेश कर्णिक हे कोकणचा परिसर प्रामुख्याने रंगविणारे ग्रामीण लेखक हिंदु - मुस्लिम संबंधावर दलवाई यांनी अत्यंत मनःपूर्वक थोडे पण बहुगुणी लेखन केले आहे. महाराष्ट्रीय समाजातील खेड्यापाड्यातील मुस्लिम समाजाच्या भावभावना ते अत्यंत तटस्थतेने आणि कलात्मकतेने 'लाट' या कथासंग्रहात रेखाटतात. कर्णिक हे विस्तराने लेखन करतात. कोकणातील माणसं त्यांचे जीवन, रूढी, परंपरा संकेत यांना खास कोकणच्या मातीचे संदर्भ आहेत.

कोकणातील दारिद्रय, दु:ख, देवदासीसारखी अनिष्ट प्रथा असे सामान्य माणसाच्या दु:खाचे अनेक पैलू कर्णिकांनी आपल्या कथेतून मांडले आहेत. कोकण प्रदेशाची सुरेख बोली त्यांनी कथेत वापरली आहे. शिवाय कथासाठी विषय निवडून काढून तो अत्यंत ओघवत्या शैलीत आकर्षक रीतीने मांडण्यात लेखक यशस्वी होतो आहे असे वाटते. त्यांचे 'कोकणी गड वस्ती', 'पारध', 'भुईचाफा', 'मंत्र', 'अजन्मा' इ. कथासंग्रह वाचकाला गुंतवून ठेवतात.

यानंतरच्या काळात तिसऱ्या पिढीत लेखन करणारे चारूता सागर, महादेव मोरे, चंद्रकुमार नलगे, भास्कर चंदनशिव यांनी मराठी ग्रामीण कथा समृध्द केली आहे. चारूता सागर यांची कथा संख्येने अल्प पण वाङ्‌मय सौंदर्याने नटलेली आहे. ग्रामीण परिसरातील भटक्या जाती जमातीना आपल्या कथालेखनाचा विषय चारूता सागर यांनी केला आहे., गारूडी, डोंबारी, नंदीवाले, जोगतिण, अशा अनेक व्यक्तींची जीवघेणी कहाणी परिणामकारक रीतीने मांडली आहे. त्यांची "नागीण" ही कथा अतिशय परिणामकारक आहे. त्यात मनाच्या दोलायमान स्थितीचे दर्शन तर घडतेच. शिवाय नाट्यमय चित्रणाचे रूपही पहावयास मिळते. त्यांच्या 'दावं', 'ढोलगं', 'निवाडा' 'पुंगी' 'वाट' याही कथा पाहण्यासारख्या आहेत. भटक्या विमुक्त जमातीच्या दु:खाची मुळे विषम समाज व्यवस्थेत आहेत हे शोधण्याचे काम त्यांची कथा करते.

महादेव मोरे यांनी ग्रामीण जीवनाचे नवे नवे भाग उजेडात आणले आहेत. निपाणीच्या आसपासचे तंबाखूच्या धंद्यातले कामगार आणि विशेषकरून टॅक्सी धंद्यातले ड्रायव्हर, क्लिनर, मालक, एजंट आणि या धंद्यात असलेले आणखी कितीतरी यांच्या आयुष्याची कर्मकहाणी मोरे यांनी आपल्या कथातून मराठीत प्रथमच चितारलेली आहेत. नेमकी भाषा व बारीकसारीक तपशीलाचा भरणा ते बेमालूमपणे करतात. 'चिताक' हा त्यांचा कथासंग्रह पाहण्यासारखा आहे. परंतु त्यांच्या नंतरच्या कथा एवढ्या परिणामकारक झाल्याचे दिसत नाही. कारण भडक नाट्य, चाळवणाऱ्या लैंगिक वर्णनाच्या आहारी गेल्याचे दिसते.

चंद्रकुमार नलगे यांची ग्रामीण कथा प्रामुख्याने कौटुंबिक आणि भावनाप्रधान वाटते. कित्येकवेळा ती भावविवश होते आणि घटनेच्या विशिष्टतेतच रेंगाळू लागते. अनेकवेळा तिला वैचारिकतेचे अधिष्ठान फारच दुबळे लाभत असल्याचे तिची भावविवशता वैयक्तिक पातळीवरच राहून कथेची आवाहन शक्तीच नाहीशी हेते.

तरीही नलगे यांनी कोल्हापूर व आसपासच्या ग्रामीण जीवनाचे प्रत्ययकारी काव्यात्मकशैलीत ओजस्वी दर्शन घडविले आहे.

भास्कर चंदनशीव यांनी आपल्या कथाविश्वातून दु:ख, दारिद्रय यांचे हृदयद्रावक चित्रण रेखाटले आहे. मात्र दु:खाचे चित्रण करणाऱ्या त्यांच्या बऱ्याचशा कथा विकृत अंगाने प्रवास करताना दिसतात. त्यांच्या कथेतील व्यक्ती अनेक नमुनेदार आहेत. गावातील पाटील, सरपंच, शेतकरी, शेतमजूर बरोबरच दांभिक, कपटी, राजकारणी साधीभोळी भाबडी, खुळी पण प्रेमळ अशा स्वभावाची ही माणसे वाचकाला आपुलकीची वाटतात. त्यांच्या व्यथा वेदना चंदनशीव यांनी उलगडून दाखविल्या आहेत. जगण्यासाठी धडपडणाऱ्या माणसांच्या दु:खाशी एकरूप झालेली कथा म्हणजे भास्कर चंदनशीव यांची कथा होय. ग्रामीण कथेला गावकुसाबाहेरचे जीवन चित्रणाकडे पुन्हा नेण्याचे काम त्यांनी केले. याच दरम्यान रंगनाथ पठारे, व. बा. बोधे यांनीही काही प्रमाणात ग्रामीण जीवनावर ती नेमकेपणाने आपल्या कथा विश्वातून प्रकाश टाकत आहेत. रंगनाथ पठारे यांनी बदलत्या खेड्यांचा वेध अर्थ केंद्राची उभारणी करून मिळवलेला पैसा आणि जाती गटाचा वापर करून सत्ता संपादन, त्या बदलातून शोषण-स्वार्थी माणूस अधिकच पिचत जात आहे. यादृष्टीने स्पष्ट वक्तेपणाचे प्रयोग हा कथासंग्रह पाहण्यासारखा आहे. सटाणा ते सटाणां न्यूज स्टोरी या संग्रहातील कथाही सामाजिक जाणिवेवर भाष्य करणाऱ्या आहेत.

व. बा. बोधे यांनी आपल्या कथेतून ग्रामीण परिसरातील रंगढंगासह अनेक प्रश्न उभे केले आहेत. अनेकविध प्रकृतीची माणसं त्याचे अज्ञान, दारिंद्रय, श्रध्दा, अंधश्रध्दा त्यांनी कथातून टिपल्या आहेत.

नागनाथ कोतापल्ले, द. ता. भोसले यांनी ग्रामीण जीवनाच्या अंतरंगाचा कानोसा आपल्या कथातून अभिव्यक्त केला आहे. ग्रामीण माणसाच्या व्यथा, वेदना यांचे विदारक वास्तव चित्रण या लेखकद्वयींनी केले आहे.

१९६० ते ७० या दरम्यानची मराठी ग्रामीण कथा आशय आणि अभिव्यक्तीच्या अंगाने प्रयोगशील स्वरूपाची होती. त्यात बदलत्या खेड्याच्या रूपबंधाचे मानवी जीवन दु:ख दारिद्रयाचे चित्रण प्रभावीपणे व्यक्त होत होते. परंतु नंतर मराठी ग्रामीण कथेला स्थितीशील स्थूलपणा तोच तोच आविष्कार अनुकरण यात गुरफटलेली काहीअंशी वरवरचे चित्रण करणारी आहे असे जाणवत राहते. त्यातही

काही कथाकाराचा अपवाद आहे. त्यानंतर नव्या दमाने लेखन करणाऱ्या पिढीमध्ये पुष्कळसे लेखन झाल्याचे आपणास दिसते. पण महाराष्ट्राच्या काना-कोपऱ्यात ग्रामीण खेडूताचे आपापल्या भागाचे प्रदेशाचे बदलत्या गावगाड्याचे चित्रणात करण्यात सुशिक्षित ग्रामीण तरूण अग्रेसर झाला आहे. प्रस्थापित व्यवस्थेत ग्रामीण तरूणाची होणारी मुस्कटदाबी त्याला आलेले कडू गोड अनुभव त्याने यथार्थपणे कथा साहित्यातून प्रभावीपणे मांडले आहेत. यात वामन होवाळ, उत्तम बंडू तुपे, श्रीराम गुंदेकर, अर्जुन शि. भोसले, विजया जहागिरदार, मोहन पाटील, आनंद पाटील अशी कितीतरी नावे लिहिता येतील.

वामन होवाळ यांचे 'बेनवाड', 'येळकोट', 'वाटा', 'आडवाट', 'वारसदार' इ. कथासंग्रह ग्रामीण जीवनाचे वास्तव दर्शन घडवतात. त्यांनी आपली कथा समाज प्रबोधनाच्या अंगाने मांडली आहे. खेडूत माणसाच्या असाह्य दु:खाचे प्रभावी चित्रण त्यात. चित्रित केले आहे. खेडूत माणसाचा अडाणीपणा, त्यातून निर्माण झाल्या श्रध्दा, अंधश्रध्दा, दु:ख, दारिद्रय, उपासमार असे अनेक विषय हाताळले आहेत.

मोहन पाटील यांनी सांगली, मिरज परिसरातील ग्रामीण माणसांच्या व्यथा,- वेदना शब्दबध्द केल्या आहेत. त्यांची कथा ही बदलत्या काळाच्या खाणाखुणा अभिव्यक्त करते. शिवाय परिवर्तनाची जाणीव मनात बाळगून मोठ्या जिद्दीने धडपडणारा नायक पाटील त्यांनी उभा केला आहे. गावगाड्यात बदलत्या विचारात, मानवी मूल्यांचा व जीवनमूल्याचा ऱ्हास होत आहे याची जाणीव पाटील यांची कथा करून देते. कोंडमारा आणि फुलपाखरू या कथासंग्रहातील कथा पाहण्यासारख्या आहेत.

श्रीराम गुंदेकर यांची ग्रामीण कथा वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्यांच्या कथेत जगण्यासाठी धडपणाऱ्या खेडूत माणसाची ओढाताण नेमकेपणाने चित्रित करण्यात ते यशस्वी झाले आहेत. शेतकरी, शेतमजूर यांचे प्रश्न हाताळण्यात गुंदेकर यांची कथा आघाडीवर आहे.

याच दरम्यान अर्जुन भोसले यांनीही आपल्या कथालेखनाला प्रारंभ केला आहे. त्यांनी ग्रामीण जीवनातील बदलत्या जगण्यातल्या तऱ्हा नेमकेपणाने मांडल्या आहेत. त्यांच्या कथेतील माणसे जगण्यासाठी रात्रंदिवस राब-राब राबतात आणि तरीही संसारासाठी ताळमेळ घालण्यात ती अयशस्वी होतात. दु:ख, दारिद्रय

यांचे चित्रण त्यांच्या कथेचा विषय केंद्रभूत न होता पार्श्वभूमी म्हणून येतो. त्यांची 'सबावाचं यबावं ' ही कथा पाहण्यासारखी आहे. या कथेत शिक्षण घेत असलेल्या मुलाची कहाणी कथन केली आहे. संस्कारी मन चांगल्या जीवनमूल्यासहित लेखकाने उभे केले आहे. तो नायक आणि त्याचे आई-वडील, आजी अज्ञान परंपरा, मूल्यधारा मानणारी लेखक वडिलांना विरोध करतो. आजीला उलट बोलतो. यातून दोन पिढीतील संघर्ष लेखकाने मांडलेला आहे.

उत्तम बंडू तुपे यांनी ग्रामजीवनात उपेक्षित माणसाची बदलत्या मूल्यव्यवस्थेत जगण्याच्या विविध तऱ्हा, वृत्ती-प्रवृत्तीसह चित्रण 'आभाळ' या कथासंग्रहातून अभिव्यक्त केले आहे. दुःख, दारिद्र्य, उपासमार हा उपेक्षित माणसाला जणू शापचं आहे. याचे विदारक दर्शन त्यात घडवले आहे. आनंद पाटील यांनी ग्रामीण जीवनाचं वास्तव अलिकडच्या काळाचं बदलतं रूप आपल्या कथेत चित्रित केले आहे. त्यांनी कथात्मक कथन करून ग्रामीण माणूस बदलत्या काळानुरूप बदलती जीवनमूल्य स्वीकारण्यात अग्रेसर आहे. त्याचे बदलाला सामोरे जातात. शिवाय माणसाच्या मनात मोठेपणा, हौस-मौजवृत्ती त्यासाठी प्रसंगी कर्जपाणी करणं आणि आहे तसंच जगावं हे विचार त्यांच्या अनेक कथातून व्यक्त झाले आहेत. 'फुगड्या' ही कथा यादृष्टीने लक्षणीय आहे.

## समकालीन कथालेखनाचे स्वरूप :

आप्पासाहेब खोत यांच्या पूर्वकालीन कथालेखनाचे स्वरूप लक्षात घेतल्यानंतर त्यांच्या समकालीन कथालेखनाचा विचार करणे गरजेचे वाटते. लेखक खोत यांच्या समकालीन लेखक महावीर जोंधळे 'नाल नसलेल्या घोड्याचा मालक' विजया राजाध्यक्ष 'हुंकार' , डॉ. वासुदेव मुलाटे 'व्यथा', 'फूल', 'अंधाररंग' 'पुर्नमिलन', टी. एस. पाटील 'अपुरी स्वप्न' , 'मन ओढाळ ओढाळ' मधुकर बडवणे 'कोंडवाडा' , 'बिऱ्हाड' इ. ४ परंतु अभ्यासाच्या सोयीसाठी म्हणून प्रतिमा इंगोले, बाबाराव मुसळे सदानंद देशमुख, नामदेव माळी (तासगाव), आनंदराव पाटील (कडेगांव), आप्पासाहेब खोत इ. चा उल्लेख करावा लागेल. यातील प्रतिमा इंगोले या विदर्भातील लेखिकेने आपल्या प्रदेशातील स्त्री-पुरूष जीवनाचे कंगोरे अनेक पदरी उलगडून दाखविले आहेत. त्यांचे 'हिरवे स्वप्न', ' सुगरिणीचा खोपा', 'अकसिदाचे दाने', 'लेक भुईची' इ.

कथासंग्रह विदर्भातील जीवनाचे अनेक प्रश्न घेऊन उभे राहिले आहेत. त्यांच्या कथेचे आशय सूत्र व्यक्ती आणि समाज व्यवस्था यांचा परस्पर संबंधाचा शोध असाच असतो. ग्रामीण जीवनातील दु:खाची कारणे समाज व्यवस्थेत शोधण्याचा त्या प्रयत्न करतात. त्यादृष्टीने 'अकसिदाचे दाने' हा कथासंग्रह पाहण्यासारखा आहे. त्या त्या कथेतील व्यक्ती या ठसठशीत असतात. खेडूत जीवन जगताना त्यांना करावा लागणारा जीवघेणा संघर्ष त्या नेमकेपणाने व्यक्त करतात. 'गढी'मधील 'बापू गुरूजी' स्त्री जीवनाची होणारी परवड त्या स्त्रीचे दु:ख, दैन्य लेखिका इंगोले यांनी अतिशय परिणामकारक रितीने चित्रित केले आहे. ग्रामीण जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन दु:खमय आहे. इंगोले यांचा विविध दु:खाचे, दैन्याचे दारिद्रयाचे, उपासमारीचे चित्रण त्या करतात. शिवाय ग्रामीण जीवनात परिवर्तनाची आलेली लाट त्यातून ढवळून निघालेले खेडे याचं वास्तव दर्शन त्या घडवतात. खेडूत माणूस जगताना नेहमीच उद्याचा विचार करून जगत असतो. त्याला आपल्या कुटुंबाची काळजी असते. त्यासाठी तो राब राब राबतो आहे. कर्जपाणी काढलं तर त्यासाठी स्वत: गहाण राहतो आहे. 'सोन्याचा गोफ' मधील सीताराम शिवाय प्रभावी निवेदनशैली , वैदर्भिय बोलीभाषेची खास लकब, लययुक्त संवाद यामुळे त्याची कथा वाचकाला अंतर्मुख बनवते.

बाबाराव मुसळे यांनी ग्रामीण माणसाचे व्यक्तिगत व सामाजिक दु:खाचे चित्रण केले आहे. माणसा-माणसातील सुष्ट-दुष्ट प्रवृत्तीचे झगडे, ग्रामीण कुटुंबातील कडू-गोड क्षणाचे चित्रण बदलत्या व्यवसायाचे, तिथल्या समस्यांचे चित्रण, ग्रामीण अंधश्रध्दा इ. विषय आशयाने त्यांची कथा समृध्द झाली आहे. 'मोहरलेला चंद्र ', 'हार-जीत', 'भुजंग', 'इंध', 'चौघडा' 'घमड्या' इ. कथा पाहण्यासारख्या आहेत. समर्थ कथाबीज, सुटसुटीत एकात्म बांधणी, प्रवाही निवेदन, व्यक्तीस्वभाव स्पष्ट करताना बोली भाषेतील संवाद याचा उपयोग करून मुसळे यांनी मराठी ग्रामीण कथा वाङ्‌मयात एक वेगळा ठसा उमटवला आहे.

सदानंद देशमुख यांचे कथाविश्व अत्यंत वाचनीय असे आहे. बदलत्या ग्रामव्यवस्थेचा आविष्कार त्यांच्या कथेत आहे. त्यांची कथा सरळ साधेपणाने साध्या घटना आणि प्रसंगातून उलगडत मानवी मनाची पकड घेते. 'अंधारबन' ग्रामीण जीवनातील वास्तव, विदारक दु:ख, दारिद्रय, तुटलेपण यांचे

चित्रण त्यांच्या कथेत येते. स्वत: देशमुख आपल्या संदर्भात लिहितात, अंधारबन हा माझा पहिला कथासंग्रह म्हणजे सुख दु:खाचा फेर धरून नाचणाऱ्या अनुभवाचे पूर्ण वर्तुळ दु:ख कधी वारूळासारखे माझ्या व्यक्तिमत्वाभोवती उगवत गेले तर कधी सुखाची वाट हिरव्यागार शिवारातून नागमोडी वळणे घेत फिरून गेली. या सर्व सोहळ्याचे रंग बांधावाचा पळस पाठीशी घेऊन मी कणाकणात भिनवून घेतले. याचे प्रत्यंतर त्यांची कथा वाचताना येत राहते.' 'जतावणी' , 'तिखटकुटी' 'झंझावात' या कथा या दृष्टीने उल्लेखनीय आहेत.

नामदेव माळी सांगली - तासगाव परिसरात वावरणारा हा लेखक मोठ्या पोटतिडकीने आपले अनुभवविश्व कथेत प्रकट करतो आहे. ग्रामीण जवीनातल्या दु:खद वेदना त्यांनी व्यक्त केल्या आहेत. परंतु माळी यांच्या कथेतील नायक प्रस्थापित व्यवस्थेत आपलं अस्तित्व दाखवण्यासाठी धडपडतो आहे. त्यांचा 'आभाळ दानी' कथासंग्रह वाचताना गावगाड्यातील पिचलेल्या माणसाचं ठसठशीत चित्रण आढळते. आजच्या ग्रामीण जीवनाचा रंग, वास, चवीचं जीवंतपण घेऊन वावरणारं अस्सल अनुभवविश्वाच्या आधारे कष्टकरी शेतकरी, शेतमजूर, कायम दुष्काळी वातावरणात होरपळलेला बे-रोजगार तरूण, तापल्या तव्यावरच्या लाह्या सारखी तडफडणारी ग्रामीण स्त्री, 'दावं' 'खुट्याशी झट्या घेणारी उपाशी जनावरं' आणि अशा भकास वातावरणातही काळजातली प्रीती , नीती आणि संस्काराची हिरवळ जपू पाहणारी माळावरची माणुसकी, कमालीच्या अस्वस्थपणे कारूण्यगर्भ शैलीत नामदेव माळी यांनी वाचकासमोर उभी केली आहे.[५] त्या दृष्टीने त्याची पाऊसपानी, आभाळदानी, भाकरी, इस्कोट चिता कथा पाहण्यासारख्या आहेत.

आनंदराव पाटील यांनीही आजच्या खेड्यातील दु:खाचे यथार्थ चित्रण कथेतून साकार केले आहे. 'चलघुल' , 'खिलारी जोडी' हे कथासंग्रह ग्रामीण जीवनाचा पट साकार करणारे आहेत. त्यांची कथा कहाणीवजा स्वरूपाची आहेत. खेड्यातील कुटुंबात घडणाऱ्या घटना साधेसुधे प्रसंग त्यावर त्यांनी आपली कथा उभी केली आहे. तिचे स्वरूप किस्सेवजा आहे. लेखकाचा हेतूच असा की, साहित्याने कथेने मनोरंजन केले पाहिजे. त्यामुळे त्यांची कथा मनोरंजनाच्या पातळीवरच राहते. खेडूत माणूस त्यांच्या कथेत चेष्टेचा विषय झाला आहे असे वाटते. तथापि काही कथांमधून त्यांनी शेती आणि शेतकऱ्याच्या संदर्भात काही प्रश्न उभे केल्याचे दिसते.

ग्रामीण नाती, त्या नात्यावर लेखक उपहासगर्भ भाष्य करतो आहे. 'म्हाताऱ्याची वाटणी ' ही कथा वाचनीय आहे.

आप्पासाहेब खोत यांनी ही ग्रामीण कथाविश्वात महत्वपूर्ण कामगिरी केली आहे. त्यांच्या कथा मानवी मनाच्या चित्रविचित्र तऱ्हा जीवन जगण्यासाठी धडपडणारी नायक - नायिका प्रस्थापित व्यवस्थेतील ग्रामीण वयस्कर माणसाची होणारी आबाळ अशा विविध विषयातून लेखक खोत यांनी कथालेखन केले आहे. 'गवनेर' , 'महापूर' , 'रानगंगा' , 'कळवंड' या कथा संग्रहातील सर्व कथा अशा स्वरूपाच्या आहेत. आपल्या कथेत काहीवेळा नाट्यमतेने घटना घडामोडी यांच्या अंगाने कथात्मक कथन, लेखंक करत राहतो. आजच्या ग्रामीण वातावरणातील बारकावे व जगण्यातल्या बदलत्या विचारधारा बदललेल्या सर्व जाणीवासह खोताची कथा टिपत राहते असे वाटते. त्यांची वाट, दसऱ्याची कडाकणी, महापूर या कथा महत्वपूर्ण अशा कथा आहेत.

तत्कालीन ज्या ज्या ग्रामीण लेखकांनी लेखणी हातात घेऊन आपले अनुभवविश्व प्रकट करायला सुरूवात केली तो काळ संक्रमण अवस्थेचा होता. या काळात बदलाच्या खाणाखुणा स्पष्टपणे अभिव्यक्त करण्याचं सामर्थ्य ग्रामीण लेखकाना प्राप्त झाले होते. आपल्या कुटुंबात, समाजात जी स्थित्यंतरे झाली, माणूस माणसाला विसरायला लागला नात्या नात्यात अंतर पडायला लागलं. माणुसकी शून्य व्यवहारात माणुसकी लोप पावायला लागली. या सर्वांचे चित्रण या पिढीतील लेखकानी केल्याचे दिसते. औद्योगिक दळणवळण, सहकार, शिक्षण, शहर-खेडे जवळीकता यातून निर्माण झालेले प्रश्न आजही काही समर्थ लेखक मोठ्या जाणीवेने हाताळताना दिसतात. बदलत्या काळाचा ग्रामीण स्थितीगतीचा विचार प्रवृत्तींचा मूल्यधारेचा कानोसा ग्रामीण कथेत लेखकांनी नेमकेपणाने अभिव्यक्त केला आहे. यात काही लेखक यशस्वी झाले आहेत. तर काही यशस्वी होण्याच्या मार्गावर आहेत. तर काहीचं लेखन हे फक्त लेखनच राहिले आहे. तथापि मराठी ग्रामीण कथा वेगवेगळ्या दिशातून वेगवेगळ्या मूल्यसंस्कार तिच्यात बहरत आहेत. तिने मराठी मध्यवर्ती केंद्रस्थान जवळ केलेले आहे असेच म्हणावे लागते.



[illegible] SHIVAJI UNIVERSITY [illegible]

**संदर्भ टीपा :-**


१) प्रतिभा साधना : ना. सी. फडके : देशमुख आणि कंपनी : १९९३ : पंधरावे मुद्रण पृ. १९४

२) ग्रामीण साहित्य स्वरूप आणि शोध : डॉ. नागनाथ कोतापल्ले : मेहता प्रकाशन, पुणे ३० : १९९३ : द्वितीयावृत्ती : पृ. ७

३) वाङ्‌मय प्रवाह : ग्रामीण साहित्य : य. च. म. मुक्त विद्यापीठ नाशिक : १९९६ : मुद्रण : पृ. ६३

४) आधुनिक मराठी वाङमयं इतिहास : डॉ. वसंत बिरादार : कैलाश पब्लिकेशन्स : औरंगाबाद : १९९९ : आवृत्ती : पृ. १११

५) आभाळदानी : नामदेव माळी : विवेक प्रकाशन वारणानगर : १९९२ : प्रथमावृत्ती मलपृष्ठ